# वर्धा जिल्हा पोलीस दलाचे वतीने जाहिर आवाहन

सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, मागिल काही दिवसांपासून काही समाजकंटक वाट्सअप ॲप, फेसबूक अशा सोशल मिडीयाच्या माध्यमातून मुले पळविणारी टोळी आली किंवा चोर आले अशा प्रकारच्या अफवा पसरवित आहेत. अशा अफवांमुळे इतर जिल्हयात जमवांकडुन बहुरुपी, वाटसरु, भिकारी व अन्य निष्पाप लोकांना जबर मारहाणीचे प्रकार घडत आहेत तर काही घटनात खुन झाले आहेत. त्यातुन अशा जमावांवर खुनासारखे गंभीर गुन्हे दाखल झाले आहेत. सध्या वर्धा जिल्हयातही अशा अफवा पसरविल्या जात असून लोकांमध्ये भिती पसरली असल्याचे निदर्शनास आले आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. बसवराज तेली, आणि वर्धा जिल्हा पोलीसांकडुन जनतेस आवाहन करण्यात येत आहे की, अफवांवर विश्वास ठेवू नका अलीकडच्या मुले पळवून नेल्याची एकही घटना घडलेली नाही किंवा जिल्हयात एकाही पोलीस ठाण्यात तशी तक्रार आलेली नाही. त्यामुळे अशी काही माहिती मिळाल्यास तातडीने जवळच्या पोलीस ठाण्यात संपर्क साधावा जर कोणी अशी अफवा पसरवित असले तर त्याचे नाव पोलीसांना कळवावे. खात्री केल्याशिवाय सोशल मिडीयावर आलेला कोणताही मॅसेज फॉरवर्ड करु नये. सोशल मिडीयातून आलेल्या मॅसेजवर डोळे झाकून विश्वास ठेवू नये. अफवा पसरविणाऱ्या तुमच्या प्रत्येक पोस्टवर पोलीसांचे लक्ष आहे. अफवा पसरविण्यास हातभार लावल्यास पोलीसांकडुन कठोर कार्यवाही करण्यात येईल, अफवेला बळी पडुन आपल्या हातून गंभीर गुन्हा घडल्यास संपुर्ण आयुष्य तुरुंगात काढावे लागण्याची शक्यता असते. त्यामुळे लोकांनी स्वत:हुन कायदा हातात घेवू नये. कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहण्यासाठी पोलीसांना सहकार्य करावे व ही माहिती आपल्या सर्व कॉन्टॅक्ट व व्हॉट्सअप ग्रुपवर शेयर करावी असे आवाहन करण्यात येत आहे.

पोलीस अधीक्षक वर्धा